क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २४८ दिनांक १९ / ०९ / २००९

विषय : मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया करताना मुत्रपिंडरोपण शस्त्रक्रिया तसेच त्यासाठी मुत्रपिंडदात्यावर कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रियेवरील संपुर्ण खर्चाची प्रतिपुर्ती मंजूर करणेबाबत.

संदर्भ : सामान्य आदेश क्र. २० (क), दिनांक १७/०६/१९६३.

.....

महावितरण कंपनीमधील कर्मचाऱ्यांना सा.आ.क्र.२०(क) दि.१७.०६.१९६३ मधील तरतुदींनुसार मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती देण्यात येते. सदर मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया करताना रूग्णाबरोबर मुत्रपिंड दात्यावरही शस्त्रक्रिया करावी लागते. अशा मुत्रपिंड दात्यावरील करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियेप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनियम करून महावितरण कंपनीमधील अधिकारी/कर्मचारी यांना मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रियेकरिता लागणाऱ्या मुत्रपिंडाकरिता मुत्रपिंडदात्यावर कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रियेवरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यास मंजुरी प्रदान केली आहे. मात्र मुत्रपिंडदात्याने मुत्रपिंडासाठी काही रकमेची मागणी केल्यास तिची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरणार नाही.

३. प्रतिपूर्तीची तरतूद हे प्रशासकीय परिपत्रक जारी करण्याच्या तारखेपासून अंमलात येईल.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सु.य.पाटील

*( सु. य. पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे

*D:\O&M\Adm.Cir - Medical.doc*